**केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत**

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन आदेश क्रमांक:संलेको-२०२४/प्र.क्र. १८ /कोषा प्रशा-१.
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२५.

## शासन आदेश

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : संकीर्ण - २०२३ / प्र. क्र. ४६ / सेवा-४, दि.०२.०२.२०२४ अन्वये, दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात आला आहे.

२. त्यानुसार, महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याबाबत विनंती केली आहे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील नमूद अधिकारी यांची खालील तक्यातील स्तंभ ४ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास म्हणजेच ०१.११.२००५ पूर्वी पदभरती / जाहिरात / अधिसूचना निर्गमित झाली असल्याने त्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व संवर्ग | नियुक्तीचा मार्ग | परीक्षेचे नाव, जाहीरात क्रमांक व जाहीरातीचा दिनांक | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. माधव धोंडीराम थैल - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब (राप) संवर्ग | महाराष्ट्र लोक सेवा आयोग | राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २००१- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब (राप), १४७७७ (१) / २००१ / तीन, दि. ३०.५.२००१ | ४.११.२००५ | ४.६.२०२४ |

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व संवर्ग | नियुक्ती चा मार्ग | परीक्षेचे नाव, जाहीरात क्रमांक व जाहीरातीचा दिनांक | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २ | श्री. विनोद किसनराव गायकवाड - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (कनिष्ठ) | महाराष्ट्र लोक सेवा आयोग | राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २००३- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (कनिष्ठ), १४७७ (१) / २००३ / तीन, दि. २३.१०.२००३ | २०.०९.२००७ | ७.३.२०२४ |
| ३ | श्री. संजय मधुकर खडसे - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब संवर्ग | महाराष्ट्र लोक सेवा आयोग | राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २००३ - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब, १४७७ (१) / २००३ / तीन, दि. २३.१०.२००३ | १९.१०.२००७ | २६.६.२०२४ |
| ४ | श्री. अभिजीत निवृत्ती खेडकर - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब संवर्ग | महाराष्ट्र लोक सेवा आयोग | राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २००३ - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब, १४७७ (१) / २००३ / तीन, दि. २३.१०.२००३ | १९.१०.२००७ | ६.७.२०२४ |
| ५ | श्रीम. शैला संजय खडसे (कु. शैला शिवाजी धोत्रे) - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब संवर्ग | महाराष्ट्र लोक सेवा आयोग | राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २००३ - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब, १४७७ (१) / २००३ / तीन, दि. २३.१०.२००३ | १९.१०.२००७ | ८.७.२०२४ |

४. उपरोक्त अधिकाऱ्यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय विहित मुदतीत सादर केला असून त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०२.०२.२०२४ नुसार जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्यात येत असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ बंद करावे.

५. उपरोक्त अधिकाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी, तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची आहरण व संवितरण

अधिकारी यांनी तात्काही कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ लागू करताना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१८/सेवा-४ दि. २.०५.२०२४ नुसार कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२) महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र,मुंबई/नागपूर*
३) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय*
४) संबंधित अधिकारी यांचे बदली कार्यालयाचे प्रमुख*
५) संबंधित अधिकारी*
६) निवडनस्ती, कोषा प्रशा-१,२ व ३, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे मार्फत)